Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor- 2.143 | Indexed (IIJIF) | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

26 April, 2018, Issue: I Vol. I

Conference Proceedings

RECENT TRENDS IN SOCIAL SCIENCES

Chief Editor

Dr. Ghanshyam H. Jadhav

Principal

S. C. S. College, Omerga. Dist. Osmanabad

Organised By

Dept. of Social Sciences

Shri Chhatrapati Shivaji College, Omerga, Dist. Osmanabad

www.rjournals.co.in

15	पंचायतराज व्यवस्थेतील महिला राजकीय आरक्षण आणि महिला सक्षमीकरण	प्रा.जवंजाळ शकुंतला देवराव	60
16	महाराष्ट्राच्या राजकारणातील स्त्रियांची भूमिका	प्रा.डॉ.संतोष कोल्हे प्रा. डॉ. सुनिल शिंदे	64
17	पंचायतराज व्यवस्था आणि त्यातील महिलांचा सहभाग	प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव	68
18	पंचायतराज व्यवस्था व महिलांचा राजकीय सहभाग	डॉ.राम प्र.ताटे प्रा.अर्चना वाघमारे	75
19	लोकशाही विकेंद्रीकरण आणि पंचायतराज	ठोंबरे महेश अशोक	78
20	नंदुरबार जिल्हयातील स्थानिक स्वशासनात आदिवासी महिलांचा राजकीय सहभाग	प्रा.वसावे अशोक रामसिंग	81
21	पंचायतराज व्यवस्था व महिलांचा राजकीय सहभाग	डॉ. डी. एल. बंजारा	86
22	लोकशाही विकेंद्रींकरण व पंचायतीराज व्यवस्था	प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे	91
23	पंचायतराज संस्थात महिलांचा सहभाग	प्रा.डॉ.अशोक नारायण गायकवाड , प्रा भोयर डी एन	94
24	ग्रामीण विकासात पंचायतराजची भूमिका	प्रा.डॉ.नागेंद्र कांबळे	98
25	पंचायतराज व्यवस्था व महिलांचा राजकीय सहभाग	सौ. डॉ. कुसूम पवार. प्रा.कटके एस.एम.	101
26	पंचायत राज व्यवस्था व महिलांचा राजकिय सहभाग	मोरे अस्मिता रमेश	104
27	पंचायतराज व्यवस्था व महिलांचा राजकीय सहभाग	मोरे संजय दिनकर	107
28	लोकशाही विकेंद्रीकरण आणि पंचायत राज्यव्यवस्था एक अभ्यास	डॉ. भिमाशंकर मधुसूदन डहाळके	110
29	पंचायतराज व्यवस्थेतील महिलांच्या राजकीय सहभागाचे वास्तव	डॉ. निलेश गोकूळ शेरे	114
30	स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला नेतृत्वाच्या प्रगतीची वाटचाल	प्रा.डॉ. तळेकर चंद्रशेखर काशिनाथ	117
31	स्थानिक स्वशासन संस्था : लोकशाही विकेंद्रीकरणाचा आधारस्तंभ	प्रा. डॉ. व्ही. एस. इंगळे	121

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I, 26 April 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

पंचायतराज व्यवस्थेतील महिला राजकीय आरक्षण आणि महिला सक्षमीकरण

प्रा.जवंजाळ शकुंतला देवराव
राज्यशास्त्र , श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी

--------- (15) ----------

प्रस्तावना -

लोकशाही शासनव्यवस्थेत सर्व नागरीकांना धर्म, जात, वंश, प्रदेश, भाषा, लिंग इ.भेदभाव न करता समान सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकारांची व संधीची प्राप्ती होते. या शासनव्यवस्थेच्या यशस्वीतेसाठी लोकांचा शासनव्यवस्थेतील सहभाग महत्वाचा असतो. लोकशाही शासनव्यवस्थेत नागरीक या संकल्पनेत स्त्री व पुरूष या दोघांना समान अधिकार व कर्तव्य अपेक्षीत आहेत. भारतीय राजकीय व्यवस्थेत स्वातंत्र्यानंतर लगेचच महिलांना पुरूषांच्या बरोबरीने समान मुलभूत व नागरी अधिकारांची प्राप्ती झाली [२]. मात्र महिलांचा राजकीय सहभाग पुरूषांच्या बरोबरीने राहिलेला नाही किंबहुना त्यांच्या सहभागाचे प्रमाण अतिशय अल्प राहिले आहे. कायद्यासमोर समानता आहे परंतु प्रत्यक्षात महिलांना सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकारां पासून नेहमीच वंचित राहावे लागले आहे. कारण प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था ही पुरूषप्रधान राहिलेली आहे. या पुरूषप्रधान व्यवस्थेने महिलांना त्यांच्या सर्व अधिकारांपासून वंचित ठेवले त्यामुळे महिला सक्षमीकरण याबाबत भारत आजही आंतरराष्ट्रीय स्तरावर मागास राष्ट्र आहे [३].

भारतात प्राचीन काळी देवता देवी म्हणून दर्जा असणारी स्त्री प्रत्यक्षात रूढी, प्रथा, परंपरेच्या व धर्माच्या नावाखाली नेहमी शोषित राहिली आहे [४]. स्वातंत्र्यानंतर घटनेने महिलांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार प्राप्त करून दिले परंतु हे अधिकार उपभोगण्याची क्षमता मात्र महिलांमध्ये आजही आलेली नाही. त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी आणि महिलांचा राजकारणातील सहभाग वाढावा या उद्देशाने ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने महिला पंचायत राज व्यवस्थेतील तिन्ही स्तरावरील संस्थांमध्ये आरक्षणाची तरतूद केली गेली. या आरक्षणाला २०१७ मध्ये २५ वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने अनेक सर्वेक्षण केली गेली. ज्यांचा हेतू राजकीय आरक्षणातून महिला सक्षमीकरण वास्तविकपणे होत आहे का याचा शोध घेणे हा होता.

महिलांना पंचायत राज मध्ये आरक्षण मिळाले त्याचा काय परिणाम झाला याबाबत दोन्ही बाजू महत्वाच्या ठरतात. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षण मिळाले त्यामुळे एकीकडे त्यांचा राजकीय सहभाग सातत्याने वाढत आहे हे निर्विवाद आहे. तर दुसरीकडे अनेक वेळा या महिला केवळ 'रबरी शिक्का' म्हणून कार्य करत असल्याची टिकाही होत आहे. त्यामुळे ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने महिलांना मिळालेल्या आरक्षणा बाबत वास्तव परिस्थिती काय आहे ? हे पाहणे संयुक्तीक ठरते. त्यासाठी प्रस्तूत शोध निबंधाचे पुढील उद्देश ठरविण्यात आले आहेत.

उद्देश :-

१. महिलांचा राजकीय सहभग ही संकल्पना जाणून घेणे.

२. ७३ व ७४ वी घटनादुरूस्ती अंतर्गत महिला आरक्षणाची तरतुद स्पष्ट करणे.

३. महिलांच्या राकीय आरक्षणाचा परिणाम जाणून घेणे.

४. महिला आरक्षण व महिला सक्षमीकरण यांचा सहसंबंध अभ्यासणे.

Copyright © Shaurya Publication, Latur | www.rjorunal | E-mail:hiteshresearch

महिलांचा राजकीय सहभाग :-

भारतात महिलांचा राजकीय सहभाग हा अल्प आहे. महिलांची एकूण लोकसंख्या व त्यांचा राजकारणातील सहभाग यांचे प्रमाण परस्पर विरूध्द राहिले आहे. महिलांचा राजकारणातील कमी सहभागास येथील सामाजिक व आर्थिक परिस्थिती कारणीभूत राहिलेली आहे. महिलांना घटनेने स्वातंत्र्यानंतर लगेचच पुरूषांच्या बरोबरीने राजकीय अधिकार प्रदान केले आहेत. ब्रिटन, अमेरिके सारख्या पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळविण्यासाठी आंदोलने करावी लागली आहेत. घटनेने महिलांना मतदानाचा अधिकार, निवडणूकीत सहभागी होण्याचा अधिकार पुरूषांच्या समान दिलेला आहे. महिलांच्या राजकीय सहभागाची सुरूवात स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या सहभागाने होते. म.गांधीजींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्यात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहिला. सविनय कायदेभंगाची चळवळ, भारत छोडे आंदोलन यात महिलांचा सहभाग उल्लेखनिय राहिला आहे [५]. स्वातंत्र्य लढ्यात पुरूषांच्या बरोबरीने आपली जबाबदारी पार पाडणाऱ्या महिला स्वातंत्र्या नंतर मात्र राजकीय क्षेत्रातून पूर्णपणे अलिप्त झाल्या. १९५२ ची पहिली सार्वत्रिक निवडणूक यात २२ महिला प्रतिनिधी निवडून आल्या व २०१४ सालच्या सोळाव्या निवडणूकीत लोकसभेच्या एकूण ५४३ सदस्यांपैकी महिला प्रतिनिधींची संख्या ६६ एवढी अल्प आहे [६]. याचा अर्थ महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात संसदेत प्रतिनिधीत्व मिळाले नाही. यास मुख्य कारण भारतातील अर्थ व राजकीय व्यवस्था जी स्त्रीयांचे नेतृत्व मान्य करण्यास आजही तयार झालेली नाही. महिलांचा राष्ट्रीय राज्य पातळीवरील सहभाग वाढावा यासाठी महिला आरक्षण विधेयक सर्वप्रथम १९९६ मध्ये मांडले गेले [७]. परंतु अजुनही प्रस्तुत विधेयकास संसदेची मान्यता मिळालेली नाही. यावरुन भारतीय पुरूषप्रधान मानसिकता स्पष्ट होते. वर्तमान काळातील भारतीय राजकीय परिस्थिती पाहता तसेच निवडणूकांमधून पैसा, सत्ता, गुंडगिरी, भ्रष्टाचार, बळाचा वापर याचा विचार करता महिला प्रतिनिधींचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना राजकीय आरक्षण मिळणे काळाची गरज आहे.

७३ व ७४ वी घटनादुरूस्ती व महिला आरक्षणाची तरतूद :-

महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ % आरक्षण विधेयक मांडण्यापूर्वी महिलांचा स्थानिक राजकारणातील सहभाग वाढावा व त्यांना आत्मविश्वासाने राजकारणात सहभाग घेता यावा, त्यांना लोकशाहीचे प्रशिक्षण मिळावे व स्थानिक विकासात महिलांचा देखील सहभाग वाढावा यासाठी १९९२ मध्ये ७३ व १९९३ मधील ७४ व्या घटनादुरूस्तीने महिलांचा पंचायतराज मधील त्रिस्तरीय संस्थांमध्ये तसेच नागरी स्थानिक संस्थांमध्ये ३३% आरक्षणाची तरतूदी केली गेली. या घटनादुरूस्ती नुसार

(१) ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या प्रत्येक संस्थामधील थेट निवडणूकी द्वारे भरावयाच्या एकूण जागा पैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव असतील.

(२) तसेच या त्रिस्तरीय रचनेतील एकूण पदांपैकी ३३% सभाध्यक्षांची पदे देखील महिलांसाठी राखीव ठेवली आहेत.

(३) नागरी स्थानिक संस्थामध्ये म्हणजेच नगरपालिका महानगरपालिका यातील एकूण सदस्य संख्येच्या ३३% जागा या महिलांसाठी राखीव आहेत.

(४) तसेच नागरी संस्थामधील एकूण सभाध्यक्षांच्या पदांपैकी ३३ टक्के पदे ही महिलांसाठी राखीव ठेवली आहेत.

उपरोक्त ३३ टक्के महिला आरक्षणाच्या प्रमाणात महाराष्ट्र २०११ साली बदल करून प्रस्तुत आरक्षणाचे प्रमाण ५० टक्के एवढे वाढविण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात स्थानिक संस्थामधील थेट निवडणूकीच्या माध्यमातून भरावयाच्या एकूण जागापैकी ५० टक्के पदे ही महिलांसाठी आरक्षित ठेवली आहेत. महिलांचा राजकारणातील सहभाग वाढावा यासाठी करण्यात आलेली प्रस्तुत तरतूदी त्यांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरत आहे. यामुळे महिलांचा ग्रामीण तसेच नागरी

संस्थांमधील सहभागात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनेक महिला राजकीय पदावर अत्यंत जबाबदारीने आपली भू... पार पाडताना आज दिसून येत आहेत. चार भिंतीच्या बाहेर स्वतःची राजकीय ओळख निर्माण करण्यासाठी, तसेच ग्रा... राजकीय दृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रस्तुत तरतुद सहाय्यभुत ठरत आहे. परंतु काही प्रमाणात याबाबत महिलांमध्ये ज... अभाव देखील दिसून येतो. त्यामुळे स्थानिक संस्थांमधील महिला आरक्षणाचा परिणाम सकारात्मक व नकारात्मक दो... मांडणे आवश्यक ठरते.

महिलांना स्थानिक संस्थांमधुन राजकीय आरक्षण मुल्यमापन

महिलांना मिळालेल्या राजकीय आरक्षणास २०१७ मध्ये २५ वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने अनेक शासकीय अशासकीय संस्थांनी याबाबत सर्वेक्षणे केली [१] व या आरक्षणाचे महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने काय परिणाम होत आहे याबाबत निष्कर्ष मांडले आहेत याबाबत केंद्रीय पंचायत राज मंत्रालयाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधुन मिळालेल्या राजकीय आरक्षणाबाबत केलेल्या सर्वेक्षणात पुढील सकारात्मक निष्कर्ष मांडले आहेत [२].

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षणामुळे महिलांचा एकंदरीत राजकीय सहभाग वाढला आहे. ही संख्या पुर्वी मतदान करणे इतपत सिमित होता. राजकीय आरक्षणामुळे महिला निवडणूकीत सहभागी होत आहेत.

(२) अनेक महिला, सरपंच, पंचायत समितीच्या सभापती, अध्यक्ष, महापौर या भुमिकांमधून राजकीय पदे सक्षम... भूषवित आहेत.

(३) महिलांचा या संस्थांमधील निर्णय प्रक्रियेत, अंदाजपत्रकावरील चर्चा व प्रशासकीय कार्य यामधून सहभाग वाढत आहे.

(४) स्थानिक संस्थांमधील आरक्षणामुळे काही भागातून महिला राजकीय नेतृत्व उदयास येत आहे.

वरीलप्रमाणे सकारात्मक बदल प्रामुख्याने महिलांबाबत दिसून येत आहेत. तर दुसरीकडे महिलांना आरक्षण दिले गेले परंतु प्रत्यक्ष त्याचा वापर केवळ रबरी शिक्का म्हणून होत आहे. असेही चित्र समाजातून पाहावयास मिळते आहे. महिला राजकीय आरक्षणाच्या दुसऱ्या बाजूचे मुल्यमापन केले असता पुढील बाबी याबाबत दिसुन येतात.

(१) महिलांना राजकीय आरक्षण मिळाले परंतु प्रत्यक्षात प्रस्थापित राजकीय पुरुषांऐवजी त्यांच्या कुटुंबातील नवीन प्रतिनिधी पुढे येत आहेत. सर्वसामान्य महिलांना यामुळे फारसा लाभ झालेला नाही [३].

(२) राजकीय पदावरील महिला सभाध्यक्षांचे अधिकार या महिला प्रतिनिधी ऐवजी त्यांच्या कुटुंबातील पुरुष व्यक्तींकडून वापरले जातात.

(३) महिलांना राजकीय अनुभव कमी असल्यामुळे त्यांच्या मार्फत योग्य निर्णय घेण्याची शक्यता कमी असते.

(४) अनुसुचित जाती जमातीच्या महिला सदस्यांचे अधिकार प्रत्यक्षात गावातील प्रतिष्ठित व प्रस्थापित पुरूषांकडून वापरले जातात [४].

वरीलपैकी दोन्ही बाजू या आरक्षणा बाबत वास्तव परिस्थिती दर्शवितात. परंतु वर्तमान राजकीय वातावरणाचा विचार करता महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी त्यांना आरक्षणाची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते.

महिलांना राजकीय आरक्षण व महिला सक्षमीकरण :-

महिलांच्या सक्षमीकरणाकरीता त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रियातील सहभाग वाढणे आवश्यक आहे. भारतातील स्त्रियांच्या सक्षमीकरणा आड, या समाजाची मानसिकता, स्त्रीयांचा दुय्यम दर्जा, रूढी, प्रथा, परंपरांचे अवडंबर, धर्माचा पगडा, या बाबी येतात. यामुळे महिला स्वतःच्या अधिकार वापरा बाबत फार सजग दिसून येत नाहीत. कायदा, घटना हे

समाज परिवर्तनाचे परिणामकारक माध्यम आहे. त्यामुळे महिलांच्या राजकीय आरक्षणा बाबत घटना दुरूस्तीमुळे महिलांच्या सक्षमीकरणाचाही मार्ग खुला झाला आहे.

लोकशाही शासन व्यवस्था यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व नागरीकांचा राजकीय व्यवस्थेत समान सहभाग असणे आवश्यक आहे. समता हे लोकशाहीचे वैशिष्ट्ये आहे. त्यामुळे स्त्री-पुरूष समान सहभागासाठी भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये महिलांसाठी आरक्षणाची आवश्यकता आहे. सामाजिक व राजकीय मागासलेपण आरक्षणाचा निषक असतो. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या मागास व राजकीय दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या समाजाच्या या वंचित वर्गासाठी राजकीय आरक्षण हा त्यांना सामाजिक न्याय देण्याचा एक मार्ग आहे. पंचायत राज व्यवस्थेमधील महिलांना मिळालेले आरक्षण, त्यांचा राजकीय सहभाग वाढवत आहे. ही महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने स्वागतार्ह बाब आहे.

सारांश :-

पंचायत राज व्यवस्थेने ग्रामीण विकासा बरोबर, सत्तेचे विकेंद्रीकरण या माध्यमातून अधिकाधिक लोकांना राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्याच बरोबर समाजातील मागास व वंचित वर्ग ज्यात महिला व अनुसुचित जाती, जमाती यांचा सहभाग केला आहे. त्यांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी आरक्षणाच्या माध्यमातून दिली आहे. पंचायत राज व महिलांचा राजकीय सहभाग यांचा आज जवळाचा सहसंबंध निर्माण झाला आहे. कारण पंचायत राज व्यवस्थेने खऱ्या अर्थाने महिलांना राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. आज या संस्था महिलांना राजकीय नेतृत्व देणाऱ्या त्यांना लोकशाहीचे प्राथमिक शिक्षण देणाऱ्या प्राथमिक संस्था ठरत आहे.

संदर्भ:-

1) https//www.goodreads.com> quotes 128939
2) saxena K.S. - Women's political participation in India subline publication - Jaipur
3) कित्ता
4) Ghosh S.K. - Indian women Through the Ages - Ashish Publishing house New Delhi Pg. No.17
5) Saxena K.S. - Womens Political Participation in India Subline Publication Jaipur Pg.No.23
6) Statistical reports of Election Commission of India
7) www.wikipedea.com .
8) कित्ता
9) pic.nic/newsite/print Release.aspxrelid=67378
10) लोकसत्ता चतुरंग लेख - महिला आरक्षण सत्तेच्या सोंगट्या- लेखिका सुवर्णा दामले (दि.6 जानेवारी 2018)
11) कित्ता